स्मार्ट PCMC
SMART CITY
epaper.mahaenews.com
महाईन्यूज™
ePaper
। शनिवार ।
दि. 11 एप्रिल 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

### सांडपाणी सोडणाऱ्यांवर व नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशारा

# नदी सुशोभीकरणा पेक्षा 'प्रदूषणमुक्ती'वरच अधिक भर

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**"एकवेळ नदी सुशोभित केली नाही तरी चालेल; मात्र ती प्रथम प्रदूषणमुक्त झालीच पाहिजे," अशी स्पष्ट भूमिका राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी येथे मांडली. राज्यातील वाढते जलप्रदूषण रोखण्यासाठी व उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी केवळ नदी पुनरुज्जीवनावर लक्ष केंद्रित करणारे स्वतंत्र 'नदी पुनरुज्जीवन प्राधिकरण' स्थापन करण्याचा निर्णय अंतिम टप्प्यात असल्याची महत्त्वपूर्ण घोषणाही त्यांनी केली.**




आकुर्डी येथील पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) मुख्यालयात आयोजित विशेष बैठकीत त्या बोलत होत्या. तत्पूर्वी, मंत्री मुंडे यांनी तळवडे येथील रॉ वॉटर पंपिंग स्टेशन व इंद्रायणी नदीची सद्यस्थिती, तसेच रावेत येथील पंपिंग स्टेशन व पवना नदीतील प्रदूषणाची पाहणी करून परिस्थितीचे गांभीर्य जाणून घेतले. यावेळी आमदार महेश लांडगे यांनी नदी प्रदूषणाची भीषणता त्यांच्या निदर्शनास आणून दिली. बैठकीत 'पीएमआरडीए' व पिंपरी-चिंचवड महापालिका (पीसीएमसी) यांच्या वतीने इंद्रायणी, पवना व मुळा-मुठा नद्यांच्या प्रदूषणमुक्तीसाठी राबविण्यात येत असलेल्या उपाययोजनांचे सादरीकरण करण्यात आले.

या बैठकीला आमदार उमा खापरे, आमदार शंकर जगताप, महापौर रवी लांडगे, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाचे सहसचिव रमेश मनाले, 'पीएमआरडीए'चे महानगर आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी, अतिरिक्त आयुक्त के. मंजुलक्ष्मी, पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, तृप्ती सांडभोर, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सहसंचालक जे. एस. साळुंके, पुणे पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता डी. एम. डुबल, एमआयडीसीचे अधीक्षक अभियंता नीलेश बोडवे, स्थायी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. 'पीएमआरडीए'चे मुख्य अभियंता रिनाज पठाण व महापालिकेचे मुख्य अभियंता संजय कुलकर्णी यांनी सविस्तर तांत्रिक माहिती दिली. बैठकीदरम्यान लोकप्रतिनिधींनी शहरातील जल व वायुप्रदूषणाबाबत चिंता व्यक्त करत राज्य सरकारने भरीव सहकार्य करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली; त्यावर मंत्री मुंडे यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

## पंकज मुंडे यांचे पीएमआरडीए, पीसीएमसीला निर्देश

स्थानिक स्वराज्य संस्था, खासगी संस्था व उद्योगांकडून सांडपाण्यावर कोणतीही प्रक्रिया न करता ते थेट नदीपात्रात सोडले जात असल्याने प्रदूषणाचा प्रश्न गंभीर झाल्याचे पंकजा मुंडे यांनी नमूद केले. "अनेक उद्योगांमध्ये सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) उभारले जातात; मात्र योग्य देखभालीअभावी ते बंद अवस्थेत असतात. यापुढे अशा उद्योगांवर केवळ नोटीस न बजावता थेट व कठोर कारवाई केली जाईल," असा इशारा त्यांनी दिला. तसेच, पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिकांनी नदीपात्रातील अतिक्रमणे तातडीने काढावीत, अशा स्पष्ट सूचनाही त्यांनी दिल्या. प्रत्येक गृहनिर्माण संस्थेस (सोसायटी) 'एसटीपी' सक्तीचा करावा व आपल्या हद्दीतील प्रत्येक नाला 'एसटीपी'ला जोडून केवळ प्रक्रिया केलेलेच पाणी नदीत जाईल, याची काटेकोर दक्षता घेण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले. जलप्रदूषणासोबतच वाढत्या वायुप्रदूषणाच्या मुद्द्यावरही या बैठकीत गंभीर चर्चा झाली. बांधकामाच्या ठिकाणी इमारती योग्य प्रकारे झाकल्या (कव्हर केल्या) न गेल्याने हवेतील धुलीकणांचे प्रमाण वाढते. त्यामुळे अशा उघड्यावर सुरू असलेल्या बांधकामांना तत्काळ नोटिसा बजावून हवेतील प्रदूषण कमी करण्याची सक्ती करण्याचे निर्देश मंत्री मुंडे यांनी 'पीएमआरडीए' व 'पीसीएमसी'ला दिले.

# महापालिकेच्या हमीपत्राचा भंग करणाऱ्या बिल्डरांवर कारवाई

## पाणीपुरवठ्याच्या गंभीर प्रश्नावरून आता बांधकाम व्यवसायिकांविरोधात कारवाईची मागणी

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**शहरातील गृहप्रकल्पांमध्ये पाणीपुरवठ्याच्या गंभीर प्रश्नावरून आता बांधकाम व्यवसायिकांविरोधात कारवाईची मागणी जोर धरू लागली आहे. 2016 नंतर उभारलेल्या गृहप्रकल्पांतील विकसकांनी दिलेल्या हमीपत्राचे उल्लंघन केल्याचा आरोप करत पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशनने महानगरपालिकेच्या मुख्य अभियंत्यांशी बैठक घेऊन कठोर पावले उचलण्याची मागणी केली.**



महानगरपालिकेच्या भामा-आसखेड प्रकल्पाचे टप्पे पूर्ण होईपर्यंत सदनिकाधारकांना पाणीपुरवठा स्वखर्चाने करण्याची लेखी हमी विकसकांनी पूर्णत्व प्रमाणपत्र घेताना दिली होती. मात्र, प्रत्यक्षात शहरातील एकाही गृहप्रकल्पात विकसकांनी ही जबाबदारी पार पाडलेली नसल्याचे फेडरेशनचे म्हणणे आहे. परिणामी, गेली अनेक वर्षे सोसायटीधारकांना टँकरद्वारे पाणी विकत घ्यावे लागत असून मोठा आर्थिक भार सहन करावा लागत आहे.

आज झालेल्या बैठकीत फेडरेशनच्या पदाधिकाऱ्यांनी या सर्व विकसकांवर तात्काळ कारवाई करण्याची जोरदार मागणी केली. तसेच, आजपर्यंत टँकरवर झालेला खर्च विकसकांकडून वसूल करून सोसायटीधारकांना परत मिळावा, असे आदेश देण्याचीही मागणी करण्यात आली. जे विकसक पैसे देण्यास टाळाटाळ करतील, त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याचीही भूमिका मांडण्यात आली. या मागण्यांवर मुख्य अभियंता श्री. ओंबासे यांनी सकारात्मक प्रतिसाद देत बांधकाम परवानगी विभागाला पत्रव्यवहार करून अशा विकसकांवर कारवाई करण्याचे निर्देश दिले जातील, असे सांगितले.

यापूर्वी पुणे विभागीय आयुक्तांकडे झालेल्या बैठकीत महानगरपालिका आयुक्तांनी हमीपत्राचे उल्लंघन करणाऱ्या विकसकांवर कारवाई केली जाईल, असे स्पष्ट केले होते. त्याच पार्श्वभूमीवर आजच्या बैठकीत फेडरेशनने आणखी कडक भूमिका घेतली. उल्लंघन करणाऱ्या विकसकांना पूर्णत्व प्रमाणपत्र देऊ नये, तसेच नव्या प्रकल्पांना परवानगी देऊ नये, अशी ठोस मागणी करण्यात आली.

### प्रशासनाच्या निर्णयाकडे लक्ष

फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे यांनी प्रशासनाकडे गेल्या दहा वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा करत असल्याचे सांगितले. “नवीन आयुक्तांनी ठोस कारवाई करून विकसकांविरुद्ध गुन्हे नोंदवावेत आणि सोसायटीधारकांचा पाच ते सहा हजार कोटी रुपयांचा खर्च परत मिळवून द्यावा,” अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. तसेच, सध्या पाणीपुरवठा न करणाऱ्या विकसकांना तातडीने जबाबदारी पार पाडण्यास भाग पाडावे, अशीही मागणी त्यांनी केली. शहरातील हजारो नागरिकांवर थेट परिणाम करणाऱ्या या प्रश्नावर प्रशासन नेमकी कोणती कारवाई करते, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

### ‘त्या’ बिल्डरांचा पूर्णत्वाचा दाखला रोखणार..!

या मागण्यांवर मुख्य अभियंता श्री. ओंबासे यांनी सकारात्मक प्रतिसाद देत बांधकाम परवानगी विभागाला पत्रव्यवहार करून अशा विकसकांवर कारवाई करण्याचे निर्देश दिले जातील, असे सांगितले. त्यानुसार उल्लंघन करणाऱ्या विकसकांना पूर्णत्व प्रमाणपत्र नाकारणे आणि नव्या परवानग्या रोखण्याचा विचार केला जाणार आहे.

# भाजपच्या ‘गुड गव्हर्नन्स’मुळेच विकास तळागाळापर्यंत पोहोचला

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**“भारतीय जनता पक्ष हा अंत्योदयाचा विचार घेऊन वाटचाल करणारा पक्ष आहे. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणे आणि नागरिकांच्या समस्यांचे विनाविलंब निराकरण करणे, हेच आमच्या सुशासनाचे अर्थात गुड गव्हर्नन्स मुख्य सूत्र आहे. या शिबिरांच्या माध्यमातून प्रशासकीय यंत्रणा थेट जनतेच्या दारी आणून नागरिकांचे जीवन अधिक सुसह्य करण्याचा आमचा प्रयत्न आहे,” असे प्रतिपादन चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप यांनी केले.**




> सामान्य माणसाला सरकारी कार्यालयात हेलपाटे मारावे लागू नयेत, हीच आमची प्रामाणिक भावना आहे. ‘गुड गव्हर्नन्स’ म्हणजे केवळ तंत्रज्ञान नव्हे, तर सर्वसामान्यांची कामे वेळेत आणि सन्मानाने होणे होय. चिंचवडमध्ये आम्ही ‘आमदार आपल्या दारी’ आणि ‘समाधान शिबिरांच्या’ माध्यमातून प्रशासकीय पारदर्शकता आणली आहे. शेवटच्या घटकापर्यंत न्याय पोहचवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.
>
> — शंकर जगताप, आमदार, चिंचवड विधानसभा.

पिंपळेगुरव येथील रामकृष्ण मंगल कार्यालयात ‘छत्रपती शिवाजी महाराज महाराष्ट्रस्व अभियान’ अंतर्गत आयोजित ‘समाधान शिबिराचे’ उद्घाटन आमदार जगताप यांच्या हस्ते झाले, यावेळी ते बोलत होते. या शिबिराला पक्षनेते प्रशांत शितोळे, माजी महापौर शंकुतला धराडे, शिक्षण मंडळ सभापती रविना अगोंळघर, नगरसेविका तृप्ती कांबळे, नगरसेविका अर्चना तापकीर, नगरसेवक शशिकांत (अप्पा) कदम, नगरसेवक श्याम जगताप, नगरसेविका पल्लवी जगताप, नगरसेविका कोमल काळे, सविता खुळे, निता पाडाळे राज्याचे अप्पर मुख्य सचिव (महसूल व नोंदणी) विकास खारगे, जमाबंदी आयुक्त शैलेश नवल, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, उपायुक्त संजिव पलांडे , अप्पर जिल्हाधिकारी सतिश राऊत, भूमी अभिलेख जिल्हाधिक्षक प्रभाकर मुसळे, प्रांताधिकारी यशवंत माने, चिंचवड अप्पर तहसीलदार जयराज देशमुख, संजय गांधी तहसीलदार अमोल कदम, नगरभूमापन अधिकारी अमित ननावरे, यांच्यासह महसूल विभागाचे अधिकारी आणि महापालिकेचे आजी माजी नगरसेवक, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार शंकर जगताप पुढे म्हणाले, भाजपच्या माध्यमातून राबवल्या जाणाऱ्या धोरणांमुळे सर्वसामान्यांना आता सरकारी कामासाठी कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागत नाहीत.आजच्या या शिबिरात एकाच छताखाली १५ प्रकारच्या विविध सरकारी सेवा आणि दाखल्यांचे वाटप करून नागरिकांच्या वेळेची आणि श्रमाची बचत करण्यात आली आहे. चिंचवड विधानसभा संघामध्ये आमदार आपल्या दारी या अभियानातून आपण नागरिकांच्या प्रश्नापर्यंत थेट पोहोचण्याचा प्रयत्न केला. ज्या माध्यमातून अनेक प्रश्न तडीस गेले. संजय गांधी निराधार योजनेचे कार्य या ठिकाणी अत्यंत चांगल्या प्रकारे होत असल्याचे आमदारांनी यावेळी नमूद केले.

राज्याचे अप्पर मुख्य सचिव (महसूल व नोंदणी) विकास खारगे यांनी यावेळी स्थानिक लोकप्रतिनिधींच्या पुढाकाराचे कौतुक केले. ते म्हणाले, “महसूल विभाग हा नागरिकांच्या जन्मापासून मृत्यूपर्यंतच्या प्रत्येक टप्प्यावर निगडित आहे. ‘मिशन डॉक्युमेंट’च्या माध्यमातून प्रत्येक नागरिकाचे जीवन सुखद व्हावे आणि राज्याची प्रगती व्हावी, हा दुहेरी हेतू आम्ही साध्य करत आहोत. चिंचवडमधील लोकप्रतिनिधींच्या सहभागामुळे शासन खऱ्या अर्थाने जनतेपर्यंत पोहोचले आहे.”

जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनीही या शिबिरामागची भूमिका मांडताना सांगितले की, नागरिकांना शासकीय कार्यालयांत फेऱ्या माराव्या लागू नयेत, यासाठी सर्व सोयी-सुविधा एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

# प्रदूषण मुक्त पाणी पुरवण्यास 'फस्ट प्रायोरिटी'

## निघोजे बंधाऱ्याच्या पाहणीसाठी राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांचा दौरा

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहराच्या जीवनवाहिन्या ठरलेल्या पवना आणि इंद्रायणी नद्यांतील वाढत्या प्रदूषणामुळे शहरवासीयांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे तात्काळ आणि दीर्घकालीन उपाययोजना करण्यासाठी राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी शहराचा दौरा केला. तसेच, इंद्रायणी नदीवरील निघोजे बंधाऱ्याची प्रत्यक्ष पाहणी केली.**



पवना आणि इंद्रायणी नद्यांमध्ये शहरी व औद्योगिक सांडपाणी थेट मिसळत असल्याने पाणी अत्यंत दूषित झाले आहे. या पाण्यात आरोग्यास घातक घटक आढळत असून भविष्यात कॅन्सरसारख्या आजारांचा धोका वाढण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, पिंपरी-चिंचवडमधील सुमारे ३५ लाख नागरिकांचे जीवन या नद्यांवर अवलंबून आहे. या पार्श्वभूमीवर आमदार महेश लांडगे यांनी विधानसभा अधिवेशनामध्ये लक्षवेधी मांडली होती. त्यावेळी रावेत आणि निघोजे या बंधाऱ्यांची पाहणी करुन ठोस उपाययोजना करण्याबाबत संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत प्रत्यक्ष पाहणी केली जाईल, असे आश्वासन पंकजा मुंडे यांनी दिले होते.

दरम्यान, पुणे जिल्ह्यातील नियोजित दौऱ्यानुसार, पंकजा मुंडे यांनी निघोजे येथील बंधाऱ्याला भेट दिली. यावेळी महापौर रवि लांडगे, आमदार महेश लांडगे, आमदार शंकर जगताप, आमदार उमा खापरे, आमदार अमित गोरखे, उपमहापौर शर्मिला बाबर, विरोधी पक्षनेता भाऊसाहेब भोईर, महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, पीएमआरडीएचे महानगर आयुक्त अभिजीत चौधरी, मुख्य अभियंता प्रमोद ओंबासे यांच्यासह महानगरपालिका, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, एमआयडीसी आणि पर्यावरण नियंत्रण महामंडळाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

### मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत बैठक व्हावी

पवना व इंद्रायणी नदीतून थेट पाणीपुरवठा बंद करून स्वतंत्र पाइपलाइन योजना राबवणे. निगडी व चिखली जलशुद्धीकरण केंद्रांवर टर्शरी ट्रीटमेंट व ओझोनेशन युनिट बसवणे. नदी सुधार प्रकल्पांत अधिक STP समाविष्ट करणे. जैवविविधता उद्याने, वृक्षारोपण आणि पर्यावरणपूरक विकासावर भर द्यावा. त्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली विशेष समिती स्थापन करावी अशी मागणी यावेळी करण्यात आली. तसेच, NRCD कडून प्रकल्पांना तात्काळ मंजुरी मिळावी. या करिता केंद्र सरकारकडे पाठपुरावा वाढवणे. सर्व प्रलंबित प्रकल्पांना गती द्यावी, अशी मागणी आमदार लांडगे यांनी दिली.

> "पिंपरी-चिंचवडमधील सुमारे ४० लाख नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने रावेत आणि निघोजे बंधाऱ्यातील पाण्याच्या प्रदूषणाचा प्रश्न गंभीर झाला आहे. याबाबत तात्काळ आणि दीर्घकालीन उपाययोजना कराव्यात. यासाठी महापालिका, पीएमआरडीए आणि राज्य शासनाकडे आम्ही सातत्त्याने पाठपुरावा करीत आहोत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली आगामी काळात दोन्ही नद्यांचा सुधार प्रकल्प आणि शुद्ध पाणी पुरवठा याबाबत कालबद्ध कार्यक्रम हाती घेणार आहोत. पुणे महानगर क्षेत्रातील सर्वच नद्यांच्या प्रदूषणमुक्तीसाठी राज्य सरकार निश्चितपणे सकारात्मक निर्णय घेत आहे.
>
> – महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

# महापालिका कर्मचाऱ्याच्या मुलाची उत्तुंग भरारी; महापौरांकडून सन्मान

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे माजी भांडारपाल भास्कर रिकामे यांचे चिरंजीव डॉ. केतन भास्कर रिकामे यांना ख्राईस्ट युनिव्हर्सिटी, बंगलोरकडून एस्ट्रोफिजिक्स विषयात पी.एच.डी. (विद्यावाचस्पती) पदवी प्रदान करण्यात आली आहे. त्यांच्या या यशाबद्दल महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी उपमहापौर शर्मिला बाबर तसेच जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक,अभिषेक फुगे, अतुल आचार्य,हनुमंत लांडगे आदी उपस्थित होते.**



निगडी येथील रहिवासी असलेले डॉ. केतन रिकामे सध्या रमन रिसर्च इन्स्टिट्यूट, बंगलोर येथे ब्लॅक होल आणि अवकाशातील घटकांमधून उत्सर्जित होणाऱ्या क्ष-किरणांच्या अभ्यासासाठी उपकरण विकसित करण्यावर संशोधन करत आहेत. त्यांनी विकसित केलेले 'एक्स-रे पोलारिमीटर' हे उपकरण जानेवारी २०२४ मध्ये इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गेनायझेशनच्या XPOSAT उपग्रहामध्ये समाविष्ट करण्यात आले आहे. श्रीहरीकोटा येथील सतीश धवन अंतरिक्ष केंद्रातून प्रक्षेपित झालेल्या या उपग्रहाद्वारे अवकाशातील ब्लॅक होलचा सखोल अभ्यास करण्याचे कार्य सुरू आहे.

या प्रकल्पामध्ये डॉ. केतन यांनी इस्रोच्या शास्त्रज्ञांसोबत काम करत उपकरणाची निर्मिती, चाचणी आणि उपग्रहात बसविण्यापर्यंतचा महत्त्वाचा सहभाग नोंदविला आहे. या उपकरणाच्या माध्यमातून अवकाशातून येणाऱ्या क्ष-किरणांचे संकलन करून त्यावर संशोधन केले जात आहे. डॉ. केतन यांनी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स त्यामध्ये एज्युकेशन आणि रिसर्च, पुणे येथून बी.एस. व एम.एस. पदवी प्राप्त केली असून, त्यानंतर इंटर-युनिव्हर्सिटी सेंटर फॉर ऍस्ट्रोनॉमी ऍन्ड ऍस्ट्रोफिजिक्स तसेच कॅलिफॉर्निया इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथे विविध संशोधन प्रकल्पांवर काम केले आहे. याशिवाय, गेल्या पाच वर्षांपासून ते रमन रिसर्च इन्स्टिट्यूट येथे डॉ. बिश्वजित पॉल व डॉ. व्ही. जितेश यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन करत असून भारतीय अंतराळ संशोधन संस्थेशीही त्यांचे संशोधन कार्य संलग्न आहे.

डॉ. केतन यांच्या यशामागे त्यांचे वडील भास्कर रिकामे यांचेही महत्त्वपूर्ण योगदान आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत भांडारपाल म्हणून कार्यरत असताना त्यांनी प्रामाणिकपणे सेवा बजावत आपल्या कुटुंबाला शिक्षणाची भक्कम पायाभरणी करून दिली. त्यांच्या कष्ट व संस्कारांमुळेच डॉ. केतन यांनी आज जागतिक पातळीवर उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

# सोसायटीधारकांपुढे महापालिका प्रशासन नमले!

## पिंपरी-चिंचवडमध्ये हौसिंग सोसायटींच्या न्यायालयीन पाठपुराव्याला मिळाले यश

**महाईन्यूज ।**
**पिंपरी-चिंचवड**

**मुंबई उच्च न्यायालयातील जनहित याचिका क्र. १२६/२०२२ (वाघोली हौसिंग सोसायटी असोसिएशन व इतर विरुद्ध युनियन ऑफ इंडिया व इतर) मधील आदेशांच्या अंमलबजावणीच्या पार्श्वभूमीवर तसेच पुणे विभागीय आयुक्तांच्या निर्देशानुसार पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील पाणीपुरवठा समस्यांवर आता वॉर्डस्तरीय बैठका घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.**




या निर्णयामुळे पिंपरी-चिंचवडमधील हौसिंग सोसायटींच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश मिळाल्याचे मानले जात आहे. सोसायटी प्रतिनिधींनी दीर्घकाळापासून मांडलेल्या पाणीटंचाई व टँकरवरील अवलंबित्वाच्या समस्यांना आता थेट प्रशासन स्तरावर ऐकून घेण्याची प्रक्रिया सुरू होत आहे. दि. २७ मार्च २०२६ रोजी विधानभवन, पुणे येथे विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत पाणीपुरवठा तक्रारींचा सविस्तर आढावा घेण्यात आला. या बैठकीत नागरिकांच्या समस्या थेट ऐकून त्यावर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी सर्व क्षेत्रीय कार्यालय स्तरावर मासिक बैठका आयोजित करण्याचे निर्देश देण्यात आले.

यानुसार पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने विविध क्षेत्रीय कार्यालयांमध्ये पदाधिकारी, नगरसदस्य, नगरसदस्या तसेच सोसायटी प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत बैठकींचे नियोजन जाहीर केले आहे. या बैठकींमध्ये पाणीपुरवठा तक्रारी, उपाययोजना आणि न्यायालयीन आदेशांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात येणार आहे.

> हौसिंग सोसायट्यांनी वर्षानुवर्षे पाणीटंचाईचा त्रास सहन केला आहे. आता न्यायालयीन आदेशांच्या अंमलबजावणीमुळे आणि महानगरपालिकेच्या वॉर्डस्तरीय बैठकींच्या निर्णयामुळे प्रत्यक्ष संवादाची आणि उत्तरदायित्वाची नवी सुरुवात होत आहे. सोसायट्यांचा पाठपुरावा आता निर्णायक टप्प्यावर पोहोचला आहे, आणि आम्हाला विश्वास आहे की या प्रक्रियेतून पाणीपुरवठ्याचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागेल.
>
> — दत्ता देशमुख, अध्यक्ष, सोसायटी फेडरेशन.

### बैठकींचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे

महापालिकेच्या क, ब, इ, ड, फ, ग, ह क्षेत्रीय कार्यालयांनुसार १३ ते २१ एप्रिल दरम्यान विविध सभागृहांमध्ये बैठका आयोजित करण्यात आल्या आहेत. या बैठकींमध्ये नागरिकांनी मागील काही वर्षांतील टँकर पाण्यावर झालेला खर्च, लेखापरीक्षित आर्थिक नोंदी तसेच उपलब्ध असल्यास दैनंदिन पाणी मीटर रीडिंगची माहिती सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पिंपरी-चिंचवड हौसिंग सोसायटी फेडरेशनचे कायदा सल्लागार अॅड. सत्या मुळे यांना महानगरपालिका प्रशासनाकडून अधिकृत पत्र पाठविण्यात आले आहे. या पत्राद्वारे न्यायालयीन आदेशांच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने सोसायटींच्या सहभागासंबंधी समन्वय साधण्याची प्रक्रिया अधिकृत केली आहे. महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे सहशहर अभियंता अजय सूर्यवंशी यांनी नागरिकांनी या बैठकींना मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या तक्रारी व पुरावे सादर करावेत, असे आवाहन केले आहे.

## विश्वशांतीसाठी सामुदायिक नवकार महामंत्र पठण; प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचा पुढाकार

**महाईन्यूज ।**
**पिंपरी-चिंचवड**

**चिंचवड येथील प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटमधील प्रतिभा इंटरनॅशनल स्कूल, प्रतिभा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड कॉम्प्युटर स्टडीज, प्रतिभा ज्युनिअर कॉलेज आणि प्रतिभा इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंटच्या सुमारे ५००० विद्यार्थी व शिक्षकांनी एकत्र येत विश्वशांतीसाठी नवकार महामंत्राच्या जपात आज उत्साहात सहभाग नोंदवला.**



यावेळी संस्थेचे संस्थापक-सचिव डॉ. दीपक शहा म्हणाले, "संपूर्ण विश्वाच्या शांती आणि सकारात्मक ऊर्जेसाठी 'विश्व नवकार दिवस' आज एकाच वेळी जगभरात साजरा करण्यात येत आहे. समाजात एकता, शांती आणि सद्भावना वृद्धिंगत करण्यासाठी या सामुदायिक नवकार महामंत्र जपाचे जगभरात आयोजन करण्यात आले आहे." जगात शांतता नांदो, या हेतूने 'जितो' पुण्याच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. क्षितिजा गांधी यांनी नवकार महामंत्राचे महत्त्व उपस्थितांना सविस्तरपणे विशद केले.

या कार्यक्रमाला कमला एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक-सचिव डॉ. दीपक शहा, प्राचार्या डॉ. क्षितिजा गांधी, एमबीएचे संचालक डॉ. सचिन बोरगावे, प्रतिभा ज्युनिअर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. वनिता कुऱ्हाडे, प्रतिभा शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. पौर्णिमा कदम, प्रतिभा स्कूलच्या मुख्याध्यापिका डॉ. वृंदा जोशी आणि संस्थेचे मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ. राजेंद्र कांकरिया यांच्यासह विविध विभागांचे विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. त्यांच्या समवेत सुमारे ५००० विद्यार्थ्यांनी या सामुदायिक नवकार महामंत्र जपात सहभाग नोंदवत विश्वशांतीचा संदेश दिला.